Open Access

IJASSH

International Journal of Arts, Social Sciences and Humanities

**(A Quarterly, Refereed, & Peer Reviewed International Journal)**
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://ijassh.aaassher.org/
ISSN (Online): 2584-1130
Volume 1, Issue 4, December 2023; Pages 08 – 11
DOI: 10.5281/zenodo.10571071
SRJIF Impact Factor (2023): 8.7

**Original Research Article**

# आपत्ती व्यवस्थापन व उपायोजना

**प्रा. डॉ. विजय विणकर**

विभाग प्रमुख, भूगोल विभाग, कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, उदगीर जिल्हा: लातूर ४१३५१७ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail: vinkar.vijay@gmail.com*

Received: 05 October, 2023 | Accepted: 11 November, 2023 | Published: 13 November, 2023

**प्रस्तावना**

जगामध्ये मानवनिर्मित तसेच नैसर्गिक आपत्ती फारच महत्त्व प्राप्त झाली आहे. जगाच्या विविध भागांमध्ये मानवनिर्मित तसेच नैसर्गिक आपत्तीची गती वाढत आहे. या संदर्भात जागतिक पातळीवर मंथन होत आहे. जगातील अनेक देशात नैसर्गिक व मानवनिर्मित समस्याच्या अध्ययनासाठी स्वतंत्र प्रशासकीय विभाग सुरू झालेले आहेत. आपत्तीचे व्यवस्थापन करत असताना आपत्तीपूर्व व्यवस्थापन यात प्रशिक्षण, जनजागृती, उपक्रम यंत्राचा सराव, प्रात्यक्षिके, आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावर आपत्ती व्यवस्थापनाचे जसे प्रयत्न होत होते तसेच प्रयत्न भारतात होऊ लागले आहेत. नैसर्गिक आपत्तीमध्ये भूकंप, पूर, दुष्काळ तर मानवनिर्मित आपत्तीमध्ये अपघात, आग या आपत्तीची कारणमीमांसा करावी लागते. पण या सर्व आपत्ती मानवाची प्रचंड प्रमाणात विविध हानी करण्यास कारणीभूत ठरतात. आपत्ती व्यवस्थापन म्हणजे पर्यावरण संतुलित व सुरक्षित बनविण्यासाठी केलेली उपाययोजना होय. आपत्ती व्यवस्थापनामुळे आपत्ती वाढवणारच नाही असे नाही परंतु आपत्ती व्यवस्थापनातून प्रत्येकाला कोणत्या प्रकारच्या आपत्तीसाठी कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी हे समजते. मानव आपल्या विकासासाठी सातत्याने धडपडत आहे ही मानवाची धडपड पूर्णतः निसर्गातच चालते. त्यामुळे दिवसेंदिवस निसर्गात मानवाचा हस्तक्षेप वाढत चालला आहे.

**उद्दिष्टे**

१. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीचा अभ्यास करणे.

२. आपत्ती व्यवस्थापनाचे नियोजन करणे.

३. आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व समजून सांगणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा संदर्भ ग्रंथ म्हणून वापर करण्यात आला आहे. यासाठी विविध पुस्तके, संशोधन पेपर, मासिके, इंटरनेटवरील माहिती याचा आढावा घेण्यात आला आहे.

**विषय विवेचन**

निसर्ग हा अनेक जैविक व अजैविक घटकांनी मिळून बनलेला आहे. या घटकांमध्ये वेगवेगळया कारणाने बदल घडून येतात. हे बदल मंद गतीने किंवा शीघ्र गतीने घडून येतात. तेव्हा पृथ्वीवर अनेक प्रलयकारी घटना घडून येतात त्यास नैसर्गिक आपत्ती असे म्हणतात.

मानवाच्या अनेक आर्थिक क्रिया प्रक्रियातून आकस्मितपणे अशा घटना घडतात की त्यामुळे प्रचंड प्रमाणात जीवित व वित्तहानी होते त्यास मानवनिर्मित आपत्ती असे म्हणतात.

**१. आपत्तीपूर्व टप्पा**

आपत्तीपूर्व टप्प्यास पूर्वतयारी म्हणता येईल. ही अवस्था सर्वात महत्त्वाची असून या टप्प्यामध्ये योग्य खबरदारी घेऊन योग्य अंमलबजावणी केल्यास आपत्तीची तीव्रता कमी होण्यास मदत होते. प्रथम आपत्तीपूर्व टप्प्यात पूर्व अंदाज घेतल्यानंतर योग्य प्रकारची कारवाई करून धोक्याची तीव्रता कमी करणे शक्य होते. आपत्ती व्यवस्थापना संदर्भात शासनाने जो कायदा केला आहे त्याची कठोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. भारत सरकारने 2005 साली आपत्ती व्यवस्थापन सुसंगत करण्यासाठी शासकीय संरचना अस्तित्वात आणली आहे.

**२. आपत्ती काळातील टप्पा**

आपत्ती काळातील टप्प्यामध्ये आपत्ती येतात किंवा आपत्तीची पूर्वकल्पना मिळता क्षणीच अंमलबजावणीचा टप्पा सुरू होतो. यामध्ये प्रथम जीवित हानी कशी टाळता येईल या दृष्टीने लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यास प्राधान्य दिले जाते. प्रथम 100 % जीवित हानी टाळण्याचा प्रयत्न केला जातो तर मालमत्तेचा शक्य तेवढा बचाव केला जातो.

**३. आपत्ती नंतरचा टप्पा**

या टप्प्यामध्ये अशा बऱ्याच कार्याचा समावेश होतो ती कार्य एकाच वेळी करणे गरजेचे असते. हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. या टप्प्यामध्ये तात्पुरते पुनर्वसन व कायमस्वरूपी पुनर्वसन करण्या संदर्भात नियोजन केले जाते. कारण या भागात होणाऱ्या कार्यासाठी शासनाला बरेच निर्णय घेणे क्रमप्राप्त असते.

आपत्ती व्यवस्थापनामध्ये वरील तीन टप्पे प्रभावीपणे राबविल्यास आपत्तीग्रस्तांना योग्य न्याय मिळू शकतो. तसेच बऱ्याच वेळा आपत्तीमध्ये होणारी जीवित व वित्तहानी टाळण्यास मदत होते.

**आपत्तीचे प्रकार**

आपत्तीचे मुख्य दोन प्रकार पडतात त्यामध्ये नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती.

**नैसर्गिक आपत्ती**

१. भूकंप
२. पूर
३. दुष्काळ
४. आग

**मानवनिर्मित आपत्ती**

१. अपघात
२. गर्दी
३. आग

**आपत्ती व्यवस्थापना संदर्भात उपाय योजना**

१. शाळा, महाविद्यालय आणि विद्यापीठे यांनी आपत्ती व्यवस्थापना संदर्भात प्रशिक्षण द्यावे.
२. आपत्ती व्यवस्थापनाची जबाबदारी शासनाची नाही तर प्रत्येक नागरिकाची आहे याचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे.
३. गाव तेथे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था निर्माण होणे गरजेचे आहे.
४. आपल्या परिसरातील संभाव्य आपत्ती कोणत्या येऊ शकतात याबद्दल सर्व स्तरातील लोकांना प्रशिक्षण देणे.
५. मानवनिर्मित आपत्तीची भविष्यात वाढ होऊ शकते त्यासाठी उपाययोजना राबविणे आवश्यक आहे.
६. आपत्ती व्यवस्थापना संदर्भात काम करणाऱ्या व्यक्ती, संस्था, प्रशासन अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.
७. आपत्तीपूर्व, आपत्ती दरम्यान व आपत्ती नंतरचे नियोजन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**सारांश**

जगातील अनेक देशात नैसर्गिक व मानवनिर्मित समस्यांच्या अध्ययनासाठी स्वतंत्र प्रशासकीय विभाग सुरू झालेले आहेत. आपत्ती व्यवस्थापन करत असताना त्याची आपत्तीपूर्व नियोजन, आपत्ती दरम्यानचे नियोजन आणि आपत्ती नंतरचे नियोजन करणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावर आपत्ती व्यवस्थापना संदर्भात प्रयत्न होणे आवश्यक आहे. आपत्ती व्यवस्थापना संदर्भात समाजात जाणीव जागृती होणे आवश्यक आहे त्याशिवाय आपत्तीचे व्यवस्थापन होणार नाही. आपत्तीचे प्रकार कोणते आहेत याचाही थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. आपत्ती व्यवस्थापना संदर्भात वेगवेगळया उपाययोजना केल्या आहेत त्याचाही आढावा घेण्यात आला आहे.

**संदर्भ सूची**

१. डोईफोडे एच.के. (2007) – “संपूर्ण मार्गदर्शक भूगोल”, स्टडी सर्कल प्रकाशन, पूणे
२. www.google.com
३. अर्जुन मुसनाडे (2014) – “आपत्ती व्यवस्थापनाचा भूगोल”, डायमंड प्रकाशन, पूणे
४. कर्नल प्र.प्र. मराठे (2010) – “आपत्ती व्यवस्थापन”, डायमंड प्रकाशन, पूणे